# प्रकरण दुसरे

## सांगली जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष : राजाराम पाटील

( १९५२ - १९६२ )

## प्रकरण दुसरे

### मा.राजारामबापू पाटील : लोकल बोर्डाचे अध्यक्ष म्हणून केलेले कार्य --
### ( १९५२ - १९६२ )

सन १९४० ते १९४५ च्या काळात हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यांचा अखेरचा लढा चालू होता.अशा राजकीय व सामाजिक परिस्थितीत श्री राजारामबापू पाटील यांचे नेतृत्व सांगली जिल्हामध्ये उदयास आले.म.फूले व राजर्षि शाहू महाराज यांच्या चळवळीचा वारसा पुढे चालविला पाहिजे या विचाराने ते प्रेरित झाले आणि ती स्फूर्ती घेऊन सांगली जिल्हामध्ये सामाजिक कार्याचे तोरण बांधावे अशी त्यांची मनीषा होती. विकृत ब्राह्मणेत्तर चळवळीचे पनरुज्जीवन करणे आवश्यक होते.ज्या कार्यामुळे खेड्यापाड्यातील अडाणी,गरीब,शेतकरी ,महार,मांग इत्यादिचे कल्याण होईल असे कार्य करण्याचा दृढ निश्चय त्याकाळामध्ये श्री राजाराम बापू पाटील यांनी केला.[१]

सातारा जिल्हा स्कूल बोर्डापासून बापूंच्या सार्वजनिक कार्याला आरंभ झाला.यापूर्वीच्या विद्यार्थी दशेत व वकीलीच्या प्रारंभकाळात राजकीय विचारांचा अभ्यास,वाचन,चर्चा,अभ्यासमंडळे यातून साध्य करण्याचा प्रयत्न बापूंनी केला.साताराला एक लहानसे पण जिज्ञासू मित्रांचे अभ्यासमंडळ होते आणि बापू त्यात अभ्यासू व शिकावू वृत्तीने व कटाक्षाने हजेरी लावीत असत.स्वातंत्र्य प्राप्तीनंतर प्रतिसरकार मधील निरनिराळ्या भूमिगत कार्यकर्त्यांच्या पाठींब्यावर अनेकांना प्रत्यक्ष सत्तेत सहभाग मिळाला.त्यामध्ये वाळवा,शिराळा तालुक्यातील बाबूजी पाटणकर,बर्डे, गुरुजींच्या नेतृत्वाखालील संघाच्या पुरस्काराने राजारामबापूंना सातारा जिल्हाच्या स्कूल बोर्डाचे अध्यक्षपद मिळाले आणि या पहिल्याच टप्प्यावर त्यांनी अभ्यासवृत्ती दुरदृष्टी,कार्यक्षमता,संघटना चातुर्य व लोकसंग्रहाची व्यापकता या गुणांची प्रचिती संपूर्ण जिल्हाला दिली.[२]

सातारा जिल्हा लोकल बोर्ड यावेळी कूपरपक्षातील लोकांच्या ताब्यात होते. या कूपर पक्षातील सर्व लोक अतिशय सधन होते व वजनदार समजले जात होते. त्यावेळी महाराष्ट्रातील गाजलेले मंत्री स्व.बाळासाहेब देसाई हे सातारा जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष होते.सातारा जिल्हामध्ये सर्वांना तापदायक ठरलेली कूपर शाही श्री बाळासाहेब देसाई यांना मोडून काढावयाची होती.या महत्वपूर्ण कार्यामध्ये त्यांनी श्री राजारामबापू पाटील यांना सातारा जिल्हा लोकल बोर्डावर सभासद म्हणून निवडून घेतले.त्यानंतर राजारामबापू पाटील सातारा स्कूल बोर्डाचे चेअरमनही झाले.सांगली संस्थान भारतीय संघराज्यात ८ मार्च इ.स.१९४८ मध्ये विलीन करण्यात आले. तेव्हा सातारा जिल्हाचे दोन जिल्हे होऊन दक्षिण सातारा हा एक नवा सांगलीचा जिल्हा अस्तित्वात आला. व सन १९५१ मध्ये श्री राजारामबापू पाटील हे दक्षिण सातारा जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष झाले. त्यावेळी त्यांनी सांगली लोकल बोर्डामध्ये लोकशाहीची राजवट निर्माण करण्याचे कठीण आणि आवाक्याबाहेरचे काम करुन आपल्या सामाजिक आणि राजकीय कर्तबगारीची मुहूर्तमेढ रोवली.[३]

सन १९५२ ते १९६२ या काळामध्ये श्री राजारामबापू पाटील हे दक्षिण सातारा व नंतर सांगली लोकल बोर्डाचे अध्यक्ष होते. यावेळी त्यांनी अनेक महत्वपूर्ण कार्ये केले. श्री कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यामुळे सातारा जिल्हामध्ये शिक्षण प्रसाराच्या कार्याला एखाद्या आंदोलनाचे स्वरुप प्राप्त झाले होते. श्री राजारामबापू पाटील यांनी शिक्षण प्रसाराचे अपूरे काम पुढे नेण्याचा प्रयत्न सुरु केला.ज्ञान ही एक फार मोठी शक्ती आहे आणि खेड्यातील कार्यकर्तादेखिल ज्ञानाच्या शर्यतीत टिकला पाहिजे अशी श्री राजारामबापू पाटील यांची प्रामाणिक भूमिका होती. म्हणून त्यांनी केलेल्या या कार्यात त्यांच्या परिवर्तनशील व्यक्तिमत्वाचा प्रत्यय येतो.सांगली जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष म्हणून निवड झाल्यानंतर त्यांनी केलेले कार्य त्याकाळात केवळ आजच्या महाराष्ट्रातच नव्हे तर कदाचित त्या काळातील मुंबई इलाख्यात अतिशय उल्लेखनीय ठरलेले होते.[४]

## लोकल बोर्डाच्या कारकिर्दीतील त्यांच्या कार्याचा आढावा --

श्री राजारामबापू पाटील यांनी लोकल बोर्डाच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर बोर्डाच्या राज्यकारभाराचे अतिशय बारकाईने निरीक्षण केले. कारभारातील अनेक दोष व त्रुटी शोधून काढून कुठे व कशी काटकसर करता येईल याचा काळजीपूर्वक अभ्यास केला ते दररोज आपल्या कचेरीमध्ये येवू लागले व आपले काम पाहू लागले. त्याचा परिणाम असा झाला की लोकल बोर्डातील कर्मचारी वर्गालाही ठीक वेळेवर येणे आवश्यक झाले. त्यामुळे नोकर वर्गाच्या बेफिकिरीला चांगलाच आळा बसला. संबंधित खात्याचे लेखनिक व अधिकारी कागदपत्रांचा अभ्यास करुनच काम बापूंच्याकडे पाठवू लागले. कामाची माहिती व प्रगती याबद्दल राजारामबापू पाटील कारकुनास समक्ष प्रश्न विचारत असत, त्यामुळे त्या कामाचा संपूर्ण तपशिल तद्संबंधिचे कायदेकानून व आडचणी याबद्दल कारकुनास अगोदरच विचार करुन ठेवावा लागत असे. कामात निष्कारण दिरंगाई केलेल्या कारकुनांचा ते चांगलाच पण प्रेमाने समाचार घेत असत. या सर्वाचा परिणाम लोकल बोर्डाच्या प्रशासनावर झाला व तेथील कारभाराला एक प्रकारची शिस्त आली.[५]

श्री राजारामबापू पाटील यांनी लोकल बोर्डाच्या कार्याला वेगळेच वळण लावले. पूर्वीच्या कार्यपध्दतीत आमुलाग्र बदल घडवून आणला व आपल्या कर्तबगारीने लोकल बोर्डास सुस्थिती प्राप्त करुन आर्थिकदृष्ट्या बदल करुन सरकार व जनता यांचा सलोखा वाढवून राज्यकारभार यशस्वीपणे केला याची साक्ष महाराष्ट्र सरकारला पटल्यामुळेच यशस्वी माप सांगली जिल्हातील जनतेच्या पदरात टाकून विविध खात्याच्या उत्कर्षासाठी व विकासासाठी राजारामबापू पाटील यांनी सरकारकडून मोठ्या प्रमाणात ग्रँटस मिळवून थोड्याच कालावधित सांगली लोकल बोर्डास चांगले दिवस प्राप्त करुन दिले.[६]

### शैक्षणिक कार्य --

सांगली जिल्हातील मागासलेपणा व अज्ञान नाहीसे करण्यासाठी त्यांनी वाळवा तालुक्यातील आपल्या कार्यक्षेत्रात व सांगली जिल्हातील वाळवा, आटपाडी, जत, विटा ( खानापूर ) , कवठेमहंकाळ, तासगांव व मिरज इत्यादि तालुक्यामध्ये

लोकल बोर्डामार्फत सुमारे ५०० शाळेच्या इमारती बांधून पूर्ण केल्या व याठिकाणी शिक्षणाची सोय गोरगरिबांना व इतर सर्वांना उपलब्ध करुन दिली.यासाठी त्यांनी जिल्हामध्ये गावोगावी पदयात्रा काढल्या व लोकांचे सहकार्य मिळविले. श्री राजारामबापू पाटील यांनी आपल्या लोकल बोर्डाच्या कार्यासाठी एक जीपगाडी खरेदी केली होती. परंतु महाराष्ट्र शासनाने याबाबत काही तांत्रिक बारीक-सारिक हरकती उपस्थित करुन आक्षेप घेतले. परंतु त्यानंतर राजारामबापू पाटील यांचे सांगली जिल्हातील काम पाहून शासनाने आपली हरकत मागे घेतली.इतकेच नव्हे तर मुंबई इलाख्यातील सर्व लोकल बोर्डाच्या अध्यक्षांना जीप घेण्याची सवलत दिली. श्री राजारामबापू पाटील यांचे या काळातील शिक्षण क्षेत्रातील काम हे काही अंशी मुंबई इलाख्यातील लोकल बोर्डाच्या कार्याला कलाटणी देणारे ठरले आहे. त्याकाळात महाराष्ट्राच्या इतर लोकल बोर्डातून १००।१२५ देखिल शाळा बांधून पूर्ण झाल्या नव्हत्या. अशा काळात बापूंनी सुमारे ५०० शाळा बांधून पूर्ण केल्या होत्या.त्यांच्या या कार्यामुळे महाराष्ट्रातील अनेक प्रमुख कार्यकर्त्यांचे लक्ष वेधून घेतले होते.[७]

## जोड रस्ते व पिण्याच्या सोई संदर्भात केलेले कार्य --

अनेक शाळेच्या इमारतीप्रमाणेच त्यांनी खेडेगावातील जोड रस्त्यावरही अतिशय भर दिला होता.या जोड रस्त्यावर त्यांनी मुंबई इलाख्याचे सर्व पुरवणी बजेट सांगली जिल्हाकडे वळविले .सांगली जिल्हात त्या काळात जोड रस्त्यांचे झालेले कार्य महाराष्ट्रातील अनेक जिल्हापेक्षा पुष्कळ जास्त होते.श्री राजारामबापू पाटील यांनी अविश्रांत परिश्रम केल्यामुळेच व हाती घेतलेल्या कामामध्ये आपले सर्व अंत:करण ओतल्यामुळे ते एवढे मोठे कार्य करु शकले.या शिवाय खेड्यातील पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नातही त्यांनी लक्ष घातले व अनेक तालुक्यातील खेड्यामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी आड खोदून बांधून घेतले. श्री राजारामबापू पाटील यांनी त्या काळात लोकल बोर्डाचे अध्यक्ष म्हणून केलेले कार्य आजही अनेकांच्या लक्षात राहिलेले दिसून येते. सांगली जिल्हाच्या आजच्या विकासाच्या कामाच्या पायाभरणीचे कार्य त्यांनी त्या काळात केलेले आहे याचा कोणालाही विसर पडणार नाही.आज जिल्हा

परिषदेतील त्या काळातील कोणताही कर्मचारी हेच सांगेल की बापूंनी त्या काळात केलेल्या कार्याला जोडच नाही शाळेच्या इमारती, पिण्याचे पाणी मिळविण्यासाठी खोदलेले आड, जोड रस्ते, राष्ट्रीय महामार्ग तसेच वाचनालये इत्यादि अनेक महत्वपूर्ण कामे त्याकाळात केली. सांगली जिल्ह्याचा आजचा जो चेहरा-मोहरा आहे तो मा. बापूंनीच त्याकाळात घडविला व जिल्ह्यातील विध्वंसक वृत्ती विधायक मार्गास लावून जिल्हा विकसित करण्याचा आटोकाट प्रयत्न केला.[८]

ग्राम पंचायतीसंदर्भात केलेल्या सुधारणा --

ग्राम पंचायतींच्या उत्कर्षासाठी श्री राजारामबापू पाटील यांनी केलेली कामगिरी ही आदर्शवत ठरली आहे. हिंदुस्थानामध्ये लोकशाही दृढमूल होऊन तिची वाढ व जोपासना करणेसाठी लोकांना लोकशाहीचे शिक्षण मिळाले पाहिजे. हिंदुस्थानामध्ये ग्राम मंडळाइतकी दुसरी प्राचिन संस्था नाही, ब्रिटिशांच्या पूर्वी ग्राम पंचायतींना महत्वाचे स्थान होते. काही कालखंडामध्ये तर ग्रामपंचायती म्हणजे स्वयंपूर्ण अशी लहान-लहान राज्ये होती. परंतु ब्रिटिश राजवटीमुळे ग्राम पंचायतीची ठिकाणे नामशेष होण्याच्या मार्गाला लागली होती व लोकांच्या हातातील आधिकार काढून घेतले गेले होते. त्यामुळे गावात निर्माण होणारा पैसा व गावची सत्ता लोकांना मिळणे अशक्य झाले होते. श्री राजारामबापू पाटील यांनी ग्राम पंचायती व त्यांची ऑफिसे (ईमारती) बळकट व कार्यक्षम करण्यासाठी प्रयत्न केले व ग्राम पंचायतींच्या विकासामध्ये येणाऱ्या आडचणी त्याचे प्रश्न जाणून घेवून त्यावरयोग्य पध्दतीने तोडगा काढून प्रत्येक गावामध्ये ग्राम पंचायतींच्या ऑफिसची सोय उपलब्ध करुन तो प्रश्न सोडविल्यामुळेच आज प्रत्येक गावात ग्राम पंचायत कार्यालये उभी असल्याचे दिसून येते.[९]

ग्राम पंचायती हा कर्तबगार स्वदेशाभिमानी अनुभवी व हुशार लोकांच्या हाती स्वाधीन कराव्यात अशी राजारामबापूंची इच्छा होती. हिंदुस्थानामध्ये सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताकाची कल्पना राबवायची असेल तर ग्रामपंचायती सुध्दा कार्यक्षम व कार्यप्रवण झाल्या पाहिजेत यासाठी ग्राम पंचायतीतील सरपंच, पंच व सेक्रेटरी हे कार्यक्षम असले पाहिजेत. त्यांनी विविध योजना राबवून ग्राम पंचायतीमधील दिसून येणारे दोष ज्यांना घालविता येत नसतील अशांनी आपल्या जागा मोकळ्या

करुन त्या जास्तीत जास्त लायक, कर्तबगार,व स्वदेशाभिमानी लोकांच्या स्वाधीन कराव्यात असे ठामपणे श्री राजारामबापू पाटील यांनी सांगितले व त्यासाठी त्यांनी विविध कार्यक्रमांतून संबंधितांना मार्गदर्शन केले.[१०]

राजारामबापू यांनी अनेक विविध क्षेत्रामध्ये जी असामान्य कामगिरी बजावली आहे, विशेषत: आजच्या पंचायत राज्याची मूळ कल्पना आपल्या सांगली जिल्हामध्ये नवीन पध्दतीने त्यांनी रुजविली ती पध्दत खरोखरच कौतुकास्पद आहे. या कर्तृत्वामागे त्यांचा गाढा अभ्यास आहे,तळमळ,नवीनदृष्टी आहे, राष्ट्रभक्ती आहे आणि दृढनिष्ठा आहे.[११]

सार्वजनिक आरोग्य व दवाखाने --

श्री राजारामबापू पाटील यांनी सर्व सामान्य लोकांचे आरोग्य उत्तम राहावे यासाठी तालुका पातळीवर व चार ते पाच गावाच्या मध्यमागी व महत्वपूर्ण असणाऱ्या गावात एक-एक दवाखाना उघडण्याबद्दलची एक योजना लोकल बोर्डासमोर ठेवली ती बोर्डाने तात्काळ मंजूर केली व त्यानुसार सार्वजनिक आरोग्य केन्द्राची स्थापना करण्यात आली .या कार्यामध्ये राजारामबापूंनी स्वत: लक्ष घालून सांगली जिल्हामध्ये अनेक ठिकाणी सार्वजनिक आरोग्य दवाखाने उघडले व याविषयी सरकारकडे जास्तीत जास्त मागणी करुन आधुनिक पध्दतीचे सरकारी दवाखाने बांधुन त्याचे काम पूर्ण केले.[१२]

महारोग्यांच्या समस्यांचे निराकन --

सर्वसामान्य गरिब जनतेचे दु:ख निवारण करणे,त्यांच्या समस्या सोडविणे यासाठी श्री बापूंनी सतत धडपड चालू ठेवली होती.जिल्हामध्ये कॉलरा,विषमज्वर व नारु इत्यादी रोगांच्या समस्येप्रमाणेच महारोग्यांची संख्या दिवसेदिवस वाढत असल्याने महारोग्यांची भयंकर मोठी समस्या निर्माण झाली होती. या वाढत्या संख्येला आळा घालणेसाठी जिल्हामध्ये एखाद्या महारोग्यांच्या रुग्णालयाची गरज होती.श्री राजारामबापू पाटील यांनी महारोग्यांच्या प्रश्नांकडे लक्ष दिले.सांगली जिल्हातील महारोग्यांना वेळीच औषधोपचार करता यावा,महारोग्यांच्या वाढत्या प्रसारास आळा बसावा.महारोग्यांनी एकत्रितपणे राहावे व त्याचे दु:ख थोडेफार

तरी हलके व्हावे यासाठी सांगली जिल्हामध्ये लोकल बोर्डामार्फत महारोग्याचे एक रुग्णालय सांगली मध्ये उघडले.बापूंनी महारोग्यांचा प्रश्न बोर्डाला भेट देणा-या प्रत्येक सरकारी अधिका-यासमोर व इतर प्रतिष्ठांच्या समोर मांडला,महारोग्यांची करूण समस्या कार्यालयीन पत्रव्यवहार करुन रीतसर कळविली त्यामुळेच सरकारने पूर्ण विचार करुन व २३ ऑगस्ट १९५१ च्या कुष्ठरोग कायद्यानुसार ( लेप्रसी ॲक्ट ) सांगली जिल्हातील या रुग्णालयास मंजूरी दिली व अशाप्रकारे श्री राजारामबापू पाटील यांनी या प्रश्नांची सोडवणूक करुन महारोगाने झपाटलेल्या लोकांच्यामध्ये चैतन्य निर्माण करण्याचा आटोकाट प्रयत्न केला.[१३]

## धर्मशाळेसंबंधी केलेली उपाय योजना --

श्री राजारामबापू पाटील यांनी लोकांच्या सोईसाठी ज्याप्रमाणे रस्ते तयार केले,त्याचप्रमाणे प्रवासी,उदमी व्यापारी यांना उतरण्यासाठी त्यांनी धर्मशाळा बांधण्याचा निर्णय घेतला.सांगली जिल्हात ठिकठिकाणी धर्मशाळा बांधून लोकांच्या गैरसोई दूर करण्याचा प्रयत्न केला.त्यांच्या कारकिर्दीत कवठेमहंकाळ ,जत,आटपाडी, वाळवा,मिरज व तासगांव तालुक्यामध्ये अनेक धर्मशाळा बांधल्या व बाहेरुन येणा-या प्रवाशांना दिलासा देण्याचे महत्वाचे कार्य पार पाडले.[१४]

## श्रमदानाची योजना --

लोकल बोर्डाचे अध्यक्ष असताना श्री राजारामबापू पाटील यांनी आणखी एक महत्वपूर्ण प्रकारची योजना राबविली ती योजना म्हणजे श्रमदानाची होय.जी गावे स्वयंमस्फूर्तीने आपआपल्या गावातील लोकहीताची कामे स्वावलंबनाने व श्रमदानातून पार पाडतील त्यांना कामाच्या झालेल्या खर्चाच्या १।४ इतकी रक्कम लोकल बोर्डा-मार्फत देण्यात येईल.हा योजनेचे स्वागत सर्वांनी केले व प्रत्येक गाव विकासासाठी कामे करु लागली.बोर्डाने किंवा सरकारने गावासाठी काय करायचे ते करावे ही जी लोकांची भावना होती त्या परावलंबी बनविणा-या भावनेला या नवीन योजनेने धक्का दिला. गावाच्या विकासामध्ये गावक-यांचा सहभाग असल्यामुळे ग्रामविकासाकडे प्रचंड जनशक्तीचा ओघ वळविण्याचा व विकास कार्यात आत्मियता निर्माण करण्याचा हा प्रयोग पुरोगामी व वैशिष्ट्यांचा ठरला.या योजनेचा फायदा सुमारे ५० गावानी

घेतला. त्यामुळेच गावागावातून विकासाची लाट निर्माण झाली.[१५]

राजारामबापूंच्या प्रेरणेमुळेच कासेगांव ते तांबवे हा चार मैल अंतराचा नदी क्चा रस्ता तसेच कासेगांव ते विठ्ठलवाडी हा एक मैल लांबीचा रस्ता तांबवे, कासेगांव, धोत्रेवाडी व विठ्ठलवाडीतील व आजूबाजूच्या लोकांनी तयार केला. त्याचे कौतुक करुन राजारामबापू पाटील यांनी अशाचप्रकारे संघटिपणे काम करण्याचे जनतेला आवाहन केले.

अशा प्रकारे बापूंनी ग्रामविकासाठी श्रमदानाची कल्पना राबविली व ग्रामविकासासाठी वाट मोकळी करुन दिली.

दळणवळणाच्या सोयी --

ग्रामीण भागाचा विकास, प्रत्येक गांवा-गांवाची प्रगती ज्या अनेक कारणावर अवलबून असते, त्यातील प्रमुख कारण म्हणजे दळणवळणाची साधने होत. म्हणून राजारामबापू पाटील यांनी दळणवळणाच्या क्षेत्रात आमुलाग्र बदल घडवून आणले. लोकांच्या ये - जा करण्यासाठी रस्त्यांची गरज आहे, काहीवेळा पावसाळ्यामध्ये वहातूक बंद होते ही वहातूक चालू ठेवण्यासाठी नदी, नाले, ओढे यावर पूल असावेत. तसेच नद्या पार करण्यासाठी नावा असाव्यात म्हणून त्यांनी लोकांचा त्रास कमी करण्यासाठी पूल व नावा बांधून घेण्याची व्यवस्था केली व नदीकाठी राहणा-या लोकांची समस्या सोडविली. अनेक जोडरस्ते यांची दुरुस्ती करुन त्यावरुन दळणवळण चालू केले, त्यामुळे प्रवास करणे सोयीचे झाले.[१६]

सांगली जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवड - (१९५७ )-

शाळेच्या इमारती, पिण्याचे पाण्याचे आड, वाचनालये, जोडरस्ते, पंचायत कार्यालये, नदी काठावरील गांवाना नावा इत्यादि विधायक कार्ये चालू असताना सन १९५७ मध्ये श्री राजारामबापू पाटील यांची सांगली जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवड झाली, ती निवड म्हणजे त्यांच्या कार्याची मिळालेली लेखी पोच पावतीच होती. अध्यक्ष या नात्याने त्यांनी सांगली जिल्हामध्ये अनेक महत्वपूर्ण उपक्रम राबविले त्यामुळेच त्याचे नाव महाराष्ट्राच्या कानाकोप-यात पसरु लागले.[१७]

श्री राजारामबापू पाटील यांची महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणून निवड व कार्य -- ( १९५९ ) --

सन १९५९ मध्ये राजारामबापू पाटील यांची त्यावेळचे द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री श्री यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणून निवड केली. त्यांच्यावरील ही जबाबदारी म्हणजे त्यांच्या अगोदरच्या १०-१२ वर्षांच्या कार्याचे परिणात स्वरुप होते. श्री यशवंतराव चव्हाण यांनी त्याचे शिक्षणमंडळ आणि लोकल बोर्डातील कार्य जवळून पाहिले होते व त्यामुळेच त्यांनी कॉंग्रेस पक्षाचे हे अवघड व महत्वपूर्ण काम त्यांच्याकडे सोपविले होते. श्री राजारामबापू पाटील यांचेकडे कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्षपद आले होते. त्यावेळी कॉंग्रेसची महाराष्ट्रामध्ये अतिशय मोडतोड झाली होती व संयुक्त महाराष्ट्राची चळवळ त्यावेळी अतिशय तीव्र स्वरुपात चालू होती. सन १९५७ मध्ये झालेल्या विधान सभेच्या निवडणुकीमध्ये कॉंग्रेसपक्षाचा दारुण पराभव झाला होता. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये त्यावेळी १३२ पैकी कॉंग्रेसचे १०० उमेदवार पराभूत झाले होते व पश्चिम महाराष्ट्रामध्ये तर कॉंग्रेसला ४-५ जागा मिळाल्या होत्या. लोकसभेच्या निवडणुकीमध्ये सुध्दा कॉंग्रेसला २३ पैकी २१ मतदार संघात पराभव पत्करावा लागला होता.

सन १९५७ ते १९५९ या काळामध्ये महाराष्ट्रामध्ये सुमारे ८ पोट निवडणुका झाल्या व त्या सर्व पोट निवडणुकामध्ये कॉंग्रेस पराभूत झाली होती. कॉंग्रेस कार्यकर्त्यांचे सर्व निधीधैर्यच खचले होते. अशा अवघड बिकट परिस्थितीत महाराष्ट्रातल्या कॉंग्रेस संघटनेची जबाबदारी राजारामबापू पाटील यांच्यावर सोपविली होती. त्यांनी या काळात अविश्रांत परिश्रम घेऊन, कॉंग्रेस पक्षाची नव्याने बांधणी करण्याचा प्रयत्न केला व गेलेले कॉंग्रेसचे अनेक कार्यकर्ते पुन्हा पक्षामध्ये आणले. या काळातील संघटनेचे कार्य आव्हानात्मक होते. श्री राजारामबापू पाटील यांनी हे आव्हान समर्थपणे पेललेले दिसून येते. या काळामध्ये महाराष्ट्राच्या ग्रामीण भागामध्ये सतत दौरे व पदयात्रा काढून कार्यकर्त्यांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण केला. बापूंनी निष्ठेने, जिद्दीने व प्रामाणिकपणे कॉंग्रेस संघटना उभी केली. त्यामुळेच पुढे झालेल्या निवडणुकीमध्ये कॉंग्रेस पक्षाला प्रचंड यश मिळाले.[१८]

संयुक्त महाराष्ट्राच्या त्या धामधुमीच्या काळामध्ये सन १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये कॉंग्रेस पक्षाची वाताहात झाली. त्या निवडणुकीत

राज्यकारभार करता येईल एवढया मर्यादित संख्येचे बहुमत जरी कॉंग्रेसने संपादन केलेले असले तरी या पक्षाचे अनेक नेते पराभूत झाले,कॉंग्रेसचे पानीपत झाले,असेच निवडणूक निकालाचे वर्णन सर्वत्र झाले. कॉंग्रेस पक्ष,पक्षाचे नेते, कार्यकर्ते हा उघड उघड चेष्टेचा विषय बनून राहिला.

राजकीय,सामाजिक दृष्टया अशा या कठीण अवस्थेमध्ये पक्ष संघटना शाबूत ठेवणे,म्हणजे तारेवरची कसरतच होती. श्री राजारामबापू पाटील यांचा कसोटीचा तो काळ ठरला. वेगवेगळ्या पातळीवर ही कसोटी होती,ती अशी की, बापूच्या पूर्वी प्रदेश कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावर जे.जे.विराजमान झालेले होते,त्या प्रतिष्ठेशी तुलना होणार होती.स्वातंत्र्यपूर्व काळातील पुढाऱ्यांच्या व्यक्तिमत्वाभोवती आदराचे एक वेगळे वलय निर्माण असावयाचे असा आदर निर्माण केलेल्या पुढाऱ्यांनी प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्षपद भुषविले होते. स्वातंत्र्योत्तर काळातील नवा जमाना सुरु होत असताना जुन्या पिढीतील नेत्यांच्या आदराला धक्का लागणार नाही. याविषयी पथ्य पाळावे लागणार होते. त्याच बरोबरच नव्या पिढीला आकर्षित करुन त्यांना बरोबर घेऊन वाटचाल करावी लागणार होती.जनमानसात पक्षाविषयी विश्वास निर्माण करावा लागणार होता.मुख्य म्हणजे महाराष्ट्राचे नेते आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय आणि पक्षीय दूरदृष्टिला पुरक होईल ,राज्यकारभाराला पोषक ठरेल. दिल्ली आणि महाराष्ट्र यांच्यात सुसंवाद राहिल असे पक्षकारण सुरु ठेवावे लागणार होते.परंतु या सर्व कार्यामध्ये राजारामबापू पाटील यशस्वी झाल्याचे दिसून येते.[१९]

राजारामबापूनी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसची जबाबदारी स्वीकारल्यानंतर निरनिराळ्या आव्हानांसी बापूंना सामना करावा लागला.विधान सभा किंवा लोकसभा निवडणूक म्हटले की,कॉंग्रेसचा हमखास पराभव असे वातावरण निर्माण झालेल्या त्याकाळात पुणे जिल्ह्यात अचानक उद्भवलेल्या लोकसभेच्या पोट निवडणूकीचे आव्हान प्रदेश कॉंग्रेस अध्यक्षांना स्वीकारावे लागले.मा.बापूंनी व मुख्यमंत्र्यानी दौंड-बारामतीचा तो मतदार संघ अक्षरश: पिंजून काढला व विस्कळीत झालेल्या

12421
A

पक्षाची एकजूट साधून विधायक आणि दर्जेदार प्रचार कार्य करुन मतदारांची मने जिंकून अखेरीस निवडणुकीत यश संपादन केले व प्रदेश कॉंग्रेसच्या कार्याचा नवा अध्याय लिहिला,गेला. या निवडणूक निकालाने प्रदेश कॉंग्रेसच्या इतिहासात आणि व्यक्तिश: बापूच्या जीवनातील नवे युग अवतरले.

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा क्षण हा संपूर्ण महाराष्ट्राच्या जीवनातील अत्युच्च समाधानाचा आनंदाचा क्षण . १ मे १९६० हा तो शुभ दिवस .संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचे शुभवर्तमान महाराष्ट्रात पोचविण्यासाठी शिवछत्रपतीचे जन्म स्थान असलेल्या ` शिवनेरी ` ची योजना झाली होती. भाग्यवती शिवनेरी संयुक्त महाराष्ट्र महाराष्ट्राचेच नवीन राज्य कायदेशिररित्या १ मे १९६० रोजी अस्तित्वात येवून मुंबईला संयुक्त महाराष्ट्राच्या मंगल कलशाची पुजा मा.श्री.यशवंतराव चव्हाण व त्यांच्या पत्नी सौ.वेणूताई चव्हाण यांच्या शुभहस्ते करण्यात आली.त्यावेळी पंतप्रधान मा.श्री पंडित जवाहरलाल नेहरु हे देखिल उपस्थित होते. परंतु हे शुभवर्तमान महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहचविण्यासाठी शिवनेरीतील ऐत्याहसिक समारंभासाठी दिवस मुकर करण्यात आला तो २७ एप्रिल १९६०, शिवनेरीवर त्या दिवशी सर्व शक्तीची पुजा करण्यात आली.शिवनेरीची पुजा म्हणजे सह्याद्रीची पुजा.मातृभूतीची पुजा,भारतमातेची पुजा,महाराष्ट्र हा सह्याद्रीचीच पुजा,करतो कारण महाराष्ट्राचा जन्मदाता व आश्रयदाता सह्याद्री.शिवछत्रपतींनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली ती सह्याद्रीवर असा हा सह्याद्री हिंदुस्थानाचा मुळाधार आहे.[२०]

संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला ही घोषणा ऐकण्यासाठी त्यादिवशी शिवनेरीवर संपूर्ण महाराष्ट्र जमा झाला होता.जन समुदायाचा अथांग सागर पसरला होता. शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राची राजकीय उंची वाढविली,त्यावेळी रायगडावर असाच प्रचंड मेळावा जमा झाला होता.तीनशे वर्षानंतर शिवनेरीवर तेच सुरम्य दर्शन घडले.या आनंदोत्सवाचे प्रदेशाध्यक्ष श्री राजारामबापू पाटील आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री यशवंतराव चव्हाण हे प्रमुख होते. या नव्या शुभ पवित्र प्रसंगाच्यावेळी शिवनेरीवर समारंभाचे यजमान म्हणून श्री राजारामबापूंना उपस्थित राहण्याचा योग यावा हे बापूचे फार मोठे भाग्य होते. राजारामबापू

पाटील यांच्या आयुष्यातील सुवर्णक्षण म्हणून या क्षणाची इतिहासात नोंद झालेली आहे. पावसाळे,उन्हाळे येतील,जातील पण या क्षणाची नोंद महाराष्ट्राच्या जीवनात निरंतरची ( कायमची ) राहणार आहे. या समारंभाच्या निमित्ताने मा.बापूची संघटन कुशलता उजळून निघाली.

श्री राजारामबापू पाटील यांची अध्यक्षीय कारकीर्द आणखी एका ऐत्यासिक घटनेने गाजली .आखिल भारतीय कॉंग्रेसच्या कार्यकारिणीची बैठक महाराष्ट्रामध्ये घेण्याचे निश्चित झाले,त्याचे यजमानपद अर्थातच प्रदेश कॉंग्रेस अध्यक्षांच्याकडे आले.आखिल भारतीय कॉंग्रेस कार्यकारिणीमध्ये त्यावेळी देशाच्या मोठमोठ्या महान नेत्यांचा समावेश होता.पुणे शहरामध्ये ही बैठक होणार असल्याने आखिल भारतीय पातळीवरील ज्येष्ठ श्रेष्ठ नेत्यांची निवासाची,त्यानंतरच्या जाहीर सभाची व्यवस्था प्रदेश कॉंग्रेस अध्यक्षांना करावी लागणार होती.त्या काळात आजच्यासारखी साधन सामुग्रीचा संपत्तीचा सुकाळ नव्हता.श्री राजारामबापू पाटील हे अध्यक्ष असूनही त्यांच्या दिमतीस एक फियाट गाडी होती.त्यापूर्वीच्या अध्यक्षांच्या त्या जुन्या गाडीतून हिंडण्यातच अध्यक्षांना समाधान मानावे लागले होते. कार्यकारिणीच्या बैठकीसाठी आणि एकूण खर्चासाठी निरनिराळ्या जिल्ह्यामध्ये दौरे करुन निधी जमा करावा लागणार होता.कार्यकारिणीची बैठक म्हटले तरी त्याला आखिल भारतीय कॉंग्रेस पक्षाच्या लहानशा आधिवेशनाचे स्वरुप प्राप्त होत असल्याने त्या अनुषंगानेच तयारी करावी लागणार होती.पुणे येथे कॉंग्रेसभवनामध्ये मा.श्री.यशवंतराव चव्हाण यांच्या उपस्थित पूर्वतयारीचा विचार करण्यासाठी बैठक झाली.त्यामध्ये किमान पाच लक्ष रुपये खर्चाचा अंदाज व्यक्त करण्यात आला. हा निधी जमा करण्याची जबाबदारी मा.बापूंनी अध्यक्ष या नात्याने स्वीकारली.औरंगाबादचे तरुण कार्यकर्ते श्री.विनायकराव पाटील हे प्रदेश कॉंग्रेसचे सेक्रेटरी म्हणून काम करीत होते व सरचिटणीस अण्णासाहेब मगर हे होते. निधी गोळा करण्यासाठी त्या काळात बापूचे अनेक जे दौरे झाले,त्यामध्ये एक मित्र या नात्याने त्यांनी सर्वांना सामील करुन घेतले. कधी निळ्या रंगाच्या त्या छोटया फियाटमधून तर कधी जीपमधून त्यांनी हे दौरे करुन जनसंपर्क साधून मोठा निधी जमविला.[२१]

कार्यकारिणीच्या बैठकीसाठी स्वत: मा.श्री जवाहरलाल नेहरु, पं.गोविंद वल्लभपंत,मौलाना अब्दुलकलम आझाद,अशा सर्व मान्यवर अभिरथी - महारथीचे पुण्यात आगमन होऊ लागताच विमान तळापासून तो त्यांच्या निवासा-स्थानापर्यन्त सर्वत्र स्वागताची,वाहनांची चोख व्यवस्था करण्यात आली होती. आखिल भारतीय नेत्यांच्या उपस्थितीचा लाभ घेण्यासाठी त्यावेळी अनेक मेळावे आयोजित करण्यात आले होते. पुणे शहरामध्ये एकच धामधूम उडाली होती. यशवंतरावाच्या सल्ल्यानुसार श्री राजारामबापू पाटील यांनी अशी सुरेख आखणी केली की, कोठेही कसलीही गडबड,गोंधळ व गैरसोय न होता हा सोहळा व्यवस्थित व शांतपणे पार पडला. जाहिर सभेच्या वेळी पंडित नेहरुंनाही यांची दखल घ्यावी लागली.समजंसपणाने समन्वय राखून हसतमुखाने पक्षाच्या कार्यासाठी स्वत:ला संपूर्णपणे झोकून देण्याच्या आगळ्या स्वभावाचे दर्शन त्यातून घडून गेले. श्री राजारामबापू पाटील यांच्या स्वभावातील विविध पैलूसंबंधी बरेच लिहिण्या - सारखे,बोलण्यासारखे आहे. लोकसंग्रह करीत राहणे हा त्यांचा स्वभाव धर्म होता. परंतु गरिबांच्या,सामान्यांच्याबद्दल त्यांना विशेष जिव्हाळा होता.त्यांच्याकडे भेटीसाठी,सल्ल्यासाठी येणाऱ्यात समाजातील सर्व थरातील ,जातीधर्मातील लोकांचा समावेश होता.[२२]

त्यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष असताना प्रामुख्याने पक्ष संघटित करुन तो काँग्रेस पक्ष ग्रामीण भागातील गोरगरिब जनतेपर्यन्त पोहचविला व आपली कारकिर्दयशस्वी करुन दाखविली.

<u>सांगली येथील शेतकरी सहकारी साखर कारखाना निर्मितीतील सहभाग -- ( १९५९ ) :</u>

श्री राजारामबापू पाटील हे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष असताना त्यांनी काँग्रेस पक्षाची पुर्नबांधणी केली व विधायक कार्यास प्रोत्साहन दिले.याच वेळी सांगली येथे १९५९ मध्ये शेतकरी सहकारी साखर कारखाना उभारणीमध्ये पुढाकार घेवून व अनेक प्रकारचे कष्ट सोसून,कारखान्यासाठी जमिन,भाग भांडवल, गोळा करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यामुळे त्यांनीच कारखान्याचे चेअरमन व्हावे असी लोकांच्याकडून मागणी होताच मनाचा मोठेपणा दाखवून सत्तेची वाट इतरांना

मोकळी करुन दिली.श्री राजारामबापू पाटील यांचे याकाळातील कारखाना उभारणीतील कार्य फारच मोठे असल्याचे दिसून येते.[२३]

श्री राजारामबापू पाटील यांचा इंग्लंड दौरा ( १९६० )

सन १९५९ मध्ये सांगली येथे शेतकरी सहकारी साखर कारखाना उभारणीमध्ये महत्वपूर्ण जबाबदारी पार पाडीत असताना सन १९६० मध्ये नव महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर दहा लोकांचे एक मंडळ लोकशाही आणि सामाजिक संस्था यांचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडला पाठविण्याचे ठरले. त्यामध्ये श्री राजारामबापू पाटील यांचा सर्वात वरचा क्रमांक होता,त्यामुळे श्री बापू सन १९६० मध्ये इंग्लंडला गेले.तेथील लोकशाही व सामाजिक संस्था यांचा आधिक सखोलपणे अभ्यास केला, व पाश्चात्य संस्कृतीला बळी न पडता व तेथील वेळ वाया न घालविता तेथील संस्कृतीचा अभ्यास करुन पुढे श्री राजारामबापू पाटील यांनी सन १९७१ मध्ये स्वत: —' लोकशाहीची क्षितिजे ' या पुस्तकाचे लेखन केले व पाश्चात्य लोकशाही व संस्कृती याचे चित्र प्रकट केले. त्यांनी केलेले लेखन अभ्यासपूर्ण असल्याचे दिसून येते.[२४]

श्री राजारामबापू पाटील शिवाजी विद्यापीठ स्थापना समितीचे सदस्य व सिनेटर --

श्री राजारामबापू पाटील इंग्लंडहून लोकशाही व सामाजिक संस्था यांचा अभ्यास करुन आल्यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.श्री यशवंतराव चव्हाण व त्यांचे सहकारी श्री बाळासाहेब देसाई व श्री राजारामबापू पाटील यांनी महाराष्ट्राचे चित्र बदलण्यासाठी व नवनवीन उपक्रम राबविण्यासाठी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले. त्यातील महत्वाचा निर्णय म्हणजे त्यावेळी महाराष्ट्रामध्ये फक्त तीनच विद्यापीठे होती, पुणे,मुंबई आणि नागपूर .सन १९६० पासून मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद येथे आणि शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर येथे स्थापन करण्याचा विचार चाललेला होता पण राज्याचा पैसा उत्पादक विकास कामात खर्च होत असल्याने या शैक्षणिक संकुलासाठी अनुदान नव्हते.पण सातारा,सांगली,कोल्हापूर,सोलापूर व रत्नागिरी या पाच जिल्हातील मुलांच्या शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी, मुलांनी उच्च विद्या - विभुषित होऊन प्राध्यापकापासून शास्त्रज्ञापर्यन्त व पत्रकारापासून कलेक्टरपर्यन्त

भरारी मारता यावी,यासाठी विद्यापीठ स्थापना व्हावी असे विचार श्री बाळासाहेब देसाई यांच्यासमोर मांडल्यानंतर दोघांनी मिळून विद्यापीठ स्थापन्यासाठी एका समितीची निर्मिती केली.त्यावेळी बापू या समितीचे सदस्य होते. या विद्यापीठाला एखाद्या प्रदेशांचे किंवा शहराचे नांव देण्यापेक्षा आपल्या महान कार्याने राष्ट्र घडविणा-या युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचे नांव देण्याचा निर्णय या समितीतील सर्व सदस्यांनी एक मताने मंजूर केला म्हणून आज विद्यापीठास शिवाजी विद्यापीठ असे नांव दिले असल्याचे दिसून येते.[२५]

स्थापना समितीने योग्य त्या कागदपत्राची पूर्तता राज्यसरकार केन्द्र सरकार,व विद्यापीठ अनुदान मंडळ नवी दिल्ली यांचेकडे सादर करुन विद्यापीठासाठी शेंकडों एकर जमिन ताब्यात घेण्यामध्ये श्री बाळासाहेब देसाई यांच्या बरोबरीने श्री राजारामबापू पाटील यांनी सुध्दा महत्वाचा वाटा उचलला व गोरगरीब, शेतक-यांच्या मुलांना मुलींना विद्यापीठातील शिक्षणाचे महत्व पटवून दिले. त्यामुळेच त्यांनी आपल्या जमिनी विद्यापीठाला दिल्या होत्या.शेतक-यांचा विश्वास संपादन करण्यामध्ये श्री बाळासाहेब देसाई व श्री राजारामबापू पाटील यांनी मोलाचा वाटा उचलला होता.

विद्यापीठाच्या इमारती बांधून पूर्ण झाल्यानंतर भारताचे राष्ट्रपती डॉ.राधाकृष्णन्न यांनी उद्घाटन केल्यानंतर राज्यपालांनी पहिले कुलगुरू म्हणून डॉ.आप्पासाहेब पवार याची नेमणूक केली. श्री बापूंचे शिक्षण आणि शिक्षणातील त्यांच्या जवळ असणारी तळमळ या जोरावरच ते शिवाजी विद्यापीठाचे सिनेटर म्हणून अनेक वर्षे काम करीत होते.[२६]

या विद्यापीठ प्रक्रियेतील एक गोष्ट मात्र श्री बापूंना खटकली होती,ती म्हणजे मूळ आराखडा पाच जिल्हांचा असताना रत्नागिरी जिल्हा मुंबई विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात तो जोडला होता. खरे तर रत्नागिरीकरांना मुंबईपेक्षा कोल्हापूर जवळचे असताना केन्द्र सरकार व विद्यापीठ अनुदान मंडळ यांनी असा का निर्णय घेतला हे बापूंना समजले नाही.तरी सुध्दा आपल्या आणि आपल्या सहका-यांच्या प्रयत्नांना यश येवून शिवाजी विद्यापीठाची स्थापना वेगाने झाली.

बरर जिल्हातील मुलांना उच्च शिक्षणाची दारे खुली झाली.याचे समाधान बापूंना मनोमन झाले होते.[२७]

ज्ञानाने,मनाने,वाणीने शुध्द आणि कृष्णा,कोयना व वारणामाई प्रमाणे संथगतीने वाहणा-या बापूंच्या सार्वजनिक जीवनाचा आदर्श आणि लाभ सांगली जिल्हातील अनेक तरुण कार्यकर्त्यांनी घेतला होता.

श्री राजारामबापू पाटील यांनी नि:स्वार्थी वृत्तीने,कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता त्यागाच्या आणि प्रेमाच्या आपुलकीने तळागाळातील समाजामध्ये जाऊन त्यांच्यात जन जागृती निर्माण करण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला होता.

अशाप्रकारे लोकल बोर्ड,देखिल विकासाची कामे करु शकते हे श्री राजारामबापू पाटील यांनी आपल्या कृतीने दाखवून दिले. सांगली जिल्हामध्ये कार्य करीत असताना सरकारशी चांगले संबंध ठेवून त्यांनी आपला कारभार चोख चालविला. सन १९५२ ते १९६२ या काळामध्ये लोकल बोर्डाच्या माध्यमातून माननीय बापूंची एक कुशल प्रशासक जागेवर निर्णय घेणारा एक उत्तम नेता अशी प्रतिमा निर्माण झाली. गरीब शेतक-यांच्या मुलांना शिक्षण मिळावे ही त्यांची तळमळीची भावना व भूमिका होती. आपल्या दहा वर्षाच्या कारकिर्दीत सांगली,जिल्हाचा चेहरा मोहरा बदलून टाकला.श्री राजारामबापू पाटील यांनी ` सत्ता ही सेवेसाठी असते भोगासाठी नव्हे ` या तंत्राचे तंतोतंत पालन केल्यामुळेच जिल्हाचा कायापालट ते करु शकले. श्री राजारामबापू पाटील यांनी लोकलबोर्डाची सुत्रे जेव्हा खाली ठेवली तेव्हा ते लोकल बोर्ड महाराष्ट्रातील एक आदर्श लोकल बोर्ड म्हणून नावाजलेले होते त्याची स्थिती अतिशय मजबूत होती. वेगवेगळ्या क्षेत्रात त्यांनी सुधारणा केल्या होत्या.[२८]

# बापूनी लिहिलेले एक पत्र

फोन नं. ११

## द. सातारा जिल्हा कॉंग्रेस कमिटी, सांगली.

| अध्यक्ष | चिटणीस | खजिनदार |
| --- | --- | --- |
| डी. डी. नवले | आर. ए. पाटील LL. B. | वसंतराव बंडूजी पाटील |
| | डी. बाब. पाटील | M. L. A. |

जा. नं.

सांगली 12-12-'48

[illegible]

[illegible]

[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]

लोकल बोर्डाचे विधायक कार्य चालू असताना मा.बापूंनी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्षपदी नियुक्ती झाली होती.त्यामुळे त्यांचा संपर्क संबंध महाराष्ट्रभर पसरलेला होता.कॉंग्रेस पक्षाची पुर्नबांधणी करुन कॉंग्रेसची शक्ती त्यांनी वाढविली. शैक्षणिक,सामाजिक व आर्थिक सुधारणा घडवून आणून जिल्ह्यामध्ये पोषक असे वातावरण निर्माण केले व नि:स्वार्थपणे सेवा करीत असताना कोणत्याही गोष्टींची मनामध्ये अभिलाषा ठेवली नाही याची दखल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.श्री.यशवंतराव चव्हाण यांना घ्यावी लागली म्हणूनच की काय मा.श्री.राजारामबापू पाटील यांना सन १९६२ च्या विधान सभेच्या निवडणुकी-मध्ये वाळवा मतदार संघात कॉंग्रेस आयचे अधिकृत उमेदवार म्हणून निवड केली गेली व त्यांना महाराष्ट्राच्या राजकारणाची सेवा करण्याची संधी उपलब्ध करुन दिली.[30]

मा.राजारामबापू पाटील यांनी संघटना बांधुन आपल्या प्रभावी व्यक्तिमत्वाच्या जोरावर जिल्हा लोकल बोर्ड जे एकदा काबीज केले ते संबंध जिल्ह्याचा कायापालट केल्यानंतरच त्या क्षेत्रातून ते बाहेर पडले. अनेक प्रकारच्या विरोधकांना ठोकरीत त्यांनी सांगली लोकल बोर्डाला सतत दहा वर्षे आपल्या अध्यक्षतेखाली ठेवले. या काळात त्यांनी शिक्षण,आरोग्य,रक्षण,पाणीपुरवठा, दवाखाने इत्यादि क्षेत्रात महत्वपूर्ण सुधारणा घडवून आणल्या व गोरगरीब लोकांचे काम अतिशय जिद्दीने पार पाडल्यामुळेच त्याचे राजकारणातील स्थान निश्चित झाले.[३१]

म्हणून मा.बापूंनी लोकल बोर्डातील केलेले कार्य आजही संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्ह्यामध्ये प्रेरणादायी असल्याचे आपणास दिसून येते.

## संदर्भ


| | | |
|---|---|---|
| १ | देशपांडे हरिभाऊ(काका) उपाध्यक्ष,कासेगांव शिक्षण संस्था,कासेगांव, | - मुलाखत,दि.२५-६-१९९३, वय ८३. |
| २ | कित्ता | - -,,- |
| ३ | सोलगडे गुरुजी(वाटेगांव) मा.बापूंचे विद्यार्थी, ता.वाळवा. | - मुलाखत, दि.३०-१२-१९९३,वय ६२. |
| ४ | प्रा.मंगुडकर मा.प. (पुणे ) | - राजारामबापू पाटील महाराष्ट्राला मिळालेला वारसा - लेख. लेख - प्रकाशन - १७ जाने.,१९८६, राजारामबापू पाटील ज्ञान प्रबोधिनी, इस्लामपूर, पृ.२८. |
| ५ | पाटील वा.ल. | - सहकपात्र ,पुणे (१९७०), पृ.३३. |
| ६ | कित्ता | - -,,- |
| ७ | प्रा.मगुडकर मा.प.(पुणे) | - राजारामबापू पाटील महाराष्ट्राला मिळालेला वारसा, लेख - प्रकाशन - १७ जाने.,१९८६, राजारामबापू पाटील,ज्ञानप्रबोधिनी, इस्लामपूर, पृ.२९. |
| ८ | प्रा.पाटील एल.के. | - कर्तृत्वाचा आदर्श, दै.अग्रदूत(सांगली), पृ.२ दि.१-८-१९८९. |
| ९ | - कित्ता - | - -,,- |

| | | |
|---|---|---|
| १० | मा.सन्दे शामराव<br>माजी डेप्युटी कलेक्टर. | - मुलाखत,दि.२९-१०-१९९३.<br>वय ६५. |
| ११ | प्रा.पाटील एल.के. | - मी पाहिलेले बापू - दै.प्रतिध्वनी,सांगली,<br>दि.१-८-८४,पृ.३. |
| १२ | पाटील वा.ल. | - राजारामबापू:एक महापुरुष,<br>दै.अग्रदूत(सांगली),दि.१-८-८४,पृ.२. |
| १३ | - कित्ता - | -,,- |
| १४ | माने आप्पासाहेब<br>माजी मुख्याध्यापक,<br>आझाद विद्यालय,कासेगांव. | - मुलाखत,दि.२८-९-९३, वय ६३. |
| १५ | - कित्ता - | - ,,-- |
| १६ | प्रा.पाटील एल.के. | - दै.अग्रदूत,सांगली,दि.१-८-८५,पृ.२. |
| १७ | पाटील बा.ल. | - सहकपात्र(पुणे)१९७०.पृ.२६. |
| १८ | प्रा.मंगूळकर मा.प. | - राजारामबापू पाटील महाराष्ट्राला मिळालेला<br>वारसा,<br>लेख - दि.१७ जाने.,१९८६,<br>प्रकाशक - राजारामबापू पाटील ज्ञान<br>प्रबोधिनी,इस्लामपूर,पृ.२८. |
| १९ | - कित्ता - | - -,,-- |
| २० | जोशी रामभाऊ | - राजारामबापू : मन मोठं असलेला माणूस<br>लेख दि.१७ जाने.,१९८६,<br>राजारामबापू पाटील ज्ञान प्रबोधिनी,<br>इस्लामपूर,पृ.३९. |
| २१ | - कित्ता - | - -,, - पृ.३८. |
| २२ | - कित्ता - | - -,,- पृ.३९ |

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | पाटील लालासाहेब कृ. | - | एक धगधगता जीवनपट राजारामबापू पाटील दै.प्रतिध्वनी (सांगली), दि.१७-१-१९८५, पृ.३. |
| २४ | -कित्ता - | - | -,,- |
| २५ | -कित्ता - | - | -,,- |
| २६ | पाटील लालासाहेब कृ. इस्लामपूर | - | मा.बापूंचे पुण्यस्मरण : एक अपेक्षा, लेख दै.प्रतिध्वनी, दि.१७-१-८६, पृ.२. |
| २७ | कित्ता | - | -,,- |
| २८ | कित्ता | - | दै.अग्रदूत (सांगली), दि.४-१०-८२, पृ.२. |
| २९ | मा.बापूंनी लिहिलेले एक पत्र | - | दि.१२-१२-१९५८, प्रकाशक-मा.राजारामबापू पाटील स्मरणिका, १९८५, चैतन्यस्मरण, पृ.२३. |
| ३० | पाटील लालासाहेब कृ. इस्लामपूर | - | दै.प्रतिध्वनी ,सांगली, दि.१७-१-१९८४, पृ.३. |
| ३१ | फडणीस रा.ता., पुणे | - | कुशल संघटक बापू, प्रकाशक - मा.राजारामबापू पाटील स्मरणिका, १९८५, चैतन्य स्मरण, पृ.४६. |